69-74

दक्षिण महाराष्ट्र केसरी, पान २ दि. ६ सप्टेंबर १९९

दक्षिण महाराष्ट्र

केसरी

# कोल्हापुरात महिला विद्यापीठासाठी प्रयत्न व्हावेत : पाटील

कोल्हापूर : 'युगस्त्री रणरागिणी ताराराणी यांची चिरंतन स्मृति रहावी, यासाठी करवीनगरीतील प्रत्येक नागरिकाने कोल्हापुरात महिला विद्यापीठ व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. मुंबईतील एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या धर्तीवर कोल्हापुरात महिला विद्यापीठ झाल्यास स्त्रियांना सर्व प्रकारच्या शिक्षणाची सुविधा प्राप्त करून देता येईल', असे आवाहन डॉ. व्ही. टी. पाटील यांनी बुधवारी केले.

कोल्हापूर जिल्हा परिषद शिक्षण विभाग, महापालिका शिक्षण मंडळ, तसेच इचलकरंजी व गडहिंग्लज नगरपरिषद शिक्षण मंडळांच्या संयुक्त विद्यमाने काल केशवराव भोसले नाट्यगृहात शिक्षक दिनानिमित्तच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक डॉ. व्ही. टी. पाटील व जिल्हा पोलिसप्रमुख शिवप्रतापसिंह यादव यांच्याहस्ते जिल्हा पुरस्कार, तसेच विशेष पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा आणि दहावी व बारावीमध्ये लक्षणीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचाहि सत्कार करण्यात आला.

दरम्यान, चट्टोपाध्याय समितीच्या शिफारसींच्या अंमलबजावणीच्या मागणीसाठी प्राथमिक शिक्षक संघटनेतर्फे शिक्षक दिनाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकून केशवराव भोसले नाट्यगृहासमोर निदर्शने करण्यात आली.

केशवराव भोसले नाट्यगृहात झालेल्या समारंभात आठ माध्यमिक, चौदा प्राथमिक व चार नगरपालिका शिक्षण मंडळ शिक्षक, तसेच पाच विशेष पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा शाल, श्रीफळ व चांदीची श्री गणेशाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. प्रारंभी जिल्हा पोलिसप्रमुख श्री. यादव यांच्याहस्ते सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

मार्गदर्शनपर भाषणात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजयकुमार यांनी लोकसभा, तसेच विधानसभा निवडणूक जनगणना करण्याच्या कार्यात शिक्षकांनी केलेल्या कामाचा गौरव करून साक्षरता अभियान मोहिमेसहि सर्व शिक्षकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमात प्रारंभी शिक्षणाधिकारी नेमचंद शितोळे यांनी सर्वांचे स्वागत केले, तर उपशिक्षणाधिकारी सौ. उज्वला पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रायव्हेट हायस्कूलचे मुख्याध्यापक द. रा. उमराणीकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**महापालिकेत शिक्षकदिन**

कोल्हापूर महापालिका शिक्षण मंडळातर्फे काल सकाळी साडेनऊ वाजता महापौर भीमसिंग रजपूत यांच्याहस्ते व प्राथमिक शिक्षण मंडळाचे सभापति शिवाजीराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली गुणवंत शिक्षक व सेवानिवृत्त सेवकांचा सत्कार करण्यात आला. सत्कार झालेल्यांत बी. के. पाटील, सौ. नंदा गद्रे, कमल गो. कारंजकर, रामचंद्र खटावकर या शिक्षकांचा, तसेच सेवानिवृत्त पर्यवेक्षिका सौ. लेलेबाई आणि लहू खैरमोडे व दत्तात्रय जिवबा महाडिक या सेवकांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रशासनाधिकारी हिंदुराव घोरपडे यांनी प्रास्ताविक केले. महापौर श्री. रजपूत यांनी शिक्षकांनी आपल्या वर्तनाने समाजापुढे आदर्श निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. रा. वा. शेंवडेगुरुजी यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्याविषयी माहिती दिली. अशोक भोईटे, उपमहापौर बंडोपंत जितकर, शिक्षिका सुनिता कांबळे यांचीहि कार्यक्रमात भाषणे झाली. सत्कारमूर्तींच्यावतीने बी. के. पाटील यांनी सत्कारास उत्तर दिले. शिक्षण मंडळ सदस्य व माजी आमदार लालासाहेब यादव यांनी, तसेच शिक्षण समिति सभापति श्री. मोरे यांनी आपल्या भाषणात चट्टोपाध्याय वेतन आयोग व बोनसबाबतच्या मागण्यांबाबतच्या अंमलबजावणीसाठी महापालिका शिक्षण मंडळ प्रयत्नशील असल्याचे सांगितले.